मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४९३८४८२




# पिंपरी चिंचवडचा अमृत कलश मुंबई मार्गे दिल्लीला!

## अमृत कलश अतिरिक्त आयुक्त खोराटे आणि जगताप यांच्याकडे सुपूर्द

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अमृत कलश यात्रा उपक्रमांतर्गत शहरातील विविध भागातून आणलेली माती आणि घराघरांतून जमा केलेले धान्य एकत्रितपणे महानगरपालिकेच्या अमृत कलशात जमा करण्यात आले असून हा कलश मुंबई मार्गे दिल्लीस पाठविण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले.

तसेच या सर्व उपक्रमांसाठी सहभाग आणि सहकार्य केल्याबद्दल या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, उप आयुक्त मिनीनाथ दंडवते, रविकिरण घोडके, माजी उपमहापौर शैलजा मोरे, शरद उर्फ राजू मिसाळ, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, खमरी मो सिक्किम नौदल अधिकारी



कॅप्टन एम सत्यनारायण मूर्ती, कमांडर सुनील शिंदे, अखिलेश विश्वकर्मा, संदीप सिंग ब्रार,लेफ्टनंट कमांडर अभिषेक वालिया, बिष्णू सर्ज,रघुनाथ सावंत, लेफ्टनंट अरविंद कृष्णन, प्रेरणा कुमारी,कॅप्टन (एमएनएस) ऐश्वर्या बी मेनन, निखीता जेम्स, दिव्या करमरकर, डॉ. किरण यादव, सुभेदार मेजर यशवंत महाडीक,लिडिंग रेडीओ ऑपरेटर डी. एच. कुलकर्णी, डॉ. तुषार गावडे माजी नगरसदस्य अमित गावडे, माजी नगरसदस्या शर्मिला बाबर, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, प्रभारी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच पालिका कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर सामुहिक पंचप्रण शपथ घेण्यात आली आणि ८ क्षेत्रीय कार्यालयातून आणलेले अमृत कलश अतिरिक्त आयुक्त खोराटे आणि जगताप यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. अतिरीक्त आयुक्त खोराटे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार माझी माती,माझा देश अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी सांगितले तसेच शहिदांच्या सन्मानार्थ शहरात दोन मध्यवर्ती ठिकाणी शहिदांच्या शिलाफलकांचे अनावरण, भारतीय स्वातंत्र्यास ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शहरात विविध ठिकठिकाणी ७५ देशी वृक्षांच्या लागवडीची रोपवाटिका, तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबीयांचा, शहिदांच्या कुटुंबीयांचा, माजी सैनिकांच्या सन्मानार्थ त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करून त्यांना कृतज्ञतापूर्वक सन्मानित करण्यात आले असल्याचे सांगून,शहरात अनेक ठिकाणी,शासकीय कार्यालयात, विविध सोसायट्यांमध्ये मातीला वंदन आणि वीरांना वंदन करण्यासाठी सामूहिक पंचप्राण शपथ घेण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारतीय नौदल मानद सचिव,लिडिंग रेडीओ ऑपरेटर डी.एच.कुलकर्णी यांनी केलेल्या प्रास्ताविकात खमरी गो सिक्किम या प्रभावी कार रॅलीबाबत माहिती दिली. या रॅलीत भारतीय नौदल, आय. एन.एस. शिवाजी, लोणावळा येथून ४५नौदल अधिकारी आणि मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड चे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले असून रॅलीचा २४ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर हा कालावधी असल्याचे त्यांनी सांगितले तसेच रॅलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना, तरूणांना लष्करातील संधी, संभावनाबद्दल प्रबोधन करणे,त्यांना प्रेरणा देणे हा असल्याचेही ते म्हणाले.या रॅलीचे स्वागत अतिरिक्त आयुक्त खोराटे आणि जगताप यांनी केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांच्या सैन्य भरती विषयक प्रश्नांबाबत कमांडर सुनिल शिंदे आणि सब लेफ्टनंट नेत्रा दामले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात देशभक्तीपर गीतांचा झंडा उंचा रहे हमारा हा कार्यक्रम सागर आठवाल आणि त्यांच्या सहका-यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पंचप्रण शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार उप आयुक्त रविकिरण घोडके यांनी मानले.

---

# रक्तदान शिबीरात प्रतिसाद, ११३ जणांचे रक्तदान

## गेल्या दहा वर्षापासून केले जात आहे रक्तदान शिबीराचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

बोपोडी येथे आयोजित रक्तदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या शिबिरात एकूण ११३ जणांनी रक्तदान केले. गोदाई सोशल फाउंडेशन अध्यक्ष व पुणे शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस विनोद दादासाहेब रणपिसे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे ब्लड सेंटरच्या माध्यमातून सर्व्हे नं. २६ लुंबिनी बुध्द विहार भीमज्योत नगर बोपोडी येथे रक्तदान शिबीर आयोजित



करण्यात आले होते. गेल्या दहा वर्षापासून रक्तदान शिबीराचे आयोजन केले जात आहे. या शिबिराचे उद्घाटन शहराध्यक्ष अरविंद शिंदे, मोहनदादा जोशी, अभय छाजेड, गोपालदादा तिवारी, दत्ताबाप्पू बहिरट, प्रदीप गायकवाड, संगिताताई तिवारी , अनिलजी पवार, राजेंद्र भुतडा, ॲड नंदलाल धिवार, ॲड. रमेश पवळे , विशाल जाधव, करीम शेख, सुंदरताई ओव्हाळ, इंद्रजीत भालेराव , ॲड विठ्ठल आरुडे , कांताताई ढोणे, चेतन अगरवाल, भोला वांजळे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून झाले. रक्तदात्याला यावेळी हेल्मेट व सॅग गिफ्ट देण्यात आले. यावेळी विजय कांबळे, योगेश पवार, जॉन पॅट्रीक, हरिश अबनावे , हेन्री अलमेडा, निखिल गायकवाड, आकाश मोरे , सुनिल अल्हाट ,अखिल गायकवाड , आशुतोष जाधव , निखिल जळावर , साजिद शेख, डॉ.दत्तप्रसाद राऊत, जयश गावडे, विकास कांबळे, आकांश चव्हाण, उषाताई जाधव , चैत्राली लोंखडे इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम चे आयोजन भिमज्योत तरूण मंडळ, भिमज्योत महिला मंडळ, भिमज्योत स्पोर्ट्स क्लब , गोदाई सोशल फाउंडेशन , सरगम मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते.

# पालकांनी, मुलांमध्ये जबाबदारीचे भान निर्माण करावे : विनायक भोंगाळे

## मुलांना यशस्वी झालेले पहायचे असेल, तर त्यांच्याकडे जबाबदारी द्या

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** स्पर्धेच्या युगात पालकांनी मुलांना सुरक्षित न ठेवता स्पर्धेत उतरण्यास तयार करावे. पाण्यात पडल्यावर पोहायला येतेच. त्यामुळे मुलांना यशस्वी झालेले पहायचे असेल, तर त्यांच्याकडे जबाबदारी द्या. त्यांना प्रयत्न करु द्या, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी व्यक्त केले. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे (एसव्हीएसपीएम) संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या जन्मदिनानिमित्त अनाथ विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप,




ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी, बीजवाटप असे विविध विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विधायक कार्याबरोबर सामाजिक बांधिलकी जपून समाजाचे देणे लागतो या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भोंगाळे बोलत होते. यावेळी भोंगाळे कुटुंबातील ज्येष्ठ मार्गदर्शक उखरडा भोंगाळे, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक कविता कडू-पाटील, खजिनदार विजया भोंगाळे, सचिव संजय भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे-पाटील, योगेश एंटरप्राईजेसचे विशेष कार्यकारी अधिकारी योगेश भोंगाळे, श्री संत गजानन महाराज सेवाभावी ट्रस्ट, श्री संत सदगुरू बाळुमामा ट्रस्ट, अभ्युदय बँकेचे प्रमुख अधिकारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत लेझीम व ढोल तशाच्या गजरात करण्यात आले. यावेळी भोंगाळे यांच्या जीवन संघर्षावर आधारित नाटिका सादर करण्यात आली. स्वामी विवेकानंद काव्य मंच तर्फे कविता सादर केली. प्रसिद्ध उद्योजक मयुर विखे-पाटील, प्रल्हाद इंगळे यांच्यासह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत सर्व शाळांचे आणि योगेश एंटरप्राईझेस ग्रुपच्या कर्मचारी यांच्यासाठी श्री विनायक सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेची घोषणा यावेळी करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष व संचालकांचा सन्मान करण्यात आला. आपल्या कर्मचाऱ्यांची मुलांच्या शिक्षणासाठी, व्यवसायासाठी आणि आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असायला हवे, या संकल्पनेतून आम्ही या संस्थेची स्थापना करीत आहोत, अशा भावना यावेळी विनायक भोंगाळे यांनी व्यक्त केल्या.

> **“ज्यांना आपले भविष्य घडवायचे असेल, तर आराम हराम आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय माणूस घडत नाही. माणूस घडल्याशिवाय समाज घडणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने कष्ट करण्याची आणि संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे.**
>
> **– विनायक भोंगाळे,**
> **संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम.**

# शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत राजमाता जिजाऊ मुलींच्या संघाला आठव्यांदा विजेतेपद

## ज्युनिअर कॉलेज चिंचवड संघाचा २७-१४ फरकाने पराभव

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** तानाजी लांडगे क्रीडा संकुल कासारवाडी येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात ताराबाई मुथा हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चिंचवड या संघाचा २७-१४अशा १३ गुणांच्या फरकाने पराभव करत सलग आठव्यांदा विजेतेपद संपादन केलेले



आहे. या स्पर्धेत संघातील कु. आदिती दौंडकर, कु.अफरीन खान, कु.हितांशी खेडेकर यांनी आक्रमक चढाया करत तसेच डावा कोपरा कु. चांदणी गौतम, उजवा कोपरा रक्षक कु. आदिती कडुसकर, डावा पाचवा मध्य रक्षक कु.मुक्ता वाकुडे,व निशा जाधव यांनी उत्कृष्ट पकडी घेत संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. तसेच उपांत्य फेरीतील रामचंद्र गायकवाड ज्युनिअर कॉलेज दिघी या संघाचा एकतर्फी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. सदर संघात पुजा जाधव, निता जाधव, निशा जाधव, दुर्गा केंद्रे, पुनम जाधव, नागिन बेलपाडे, अफ्रिन खान, आदिती दौंडकर, चांदणी गौतम, हिमांशी खेडेकर, आदित्य कडुसकर, मुक्ता वाकुडे या सर्व खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंची अहमदनगर येथे होणाऱ्या शालेय विभागस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेली आहे. या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले. या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष व भोसरीचे प्रथम आमदार विलासराव लांडे यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागस्तरीय कबड्डी स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे, विश्वस्त व नगरसेवक विक्रांत लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी, उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# पुण्यात कारभारी बरेच बदललेत!

## आता मला पुण्यात काम करावे लागेल : सुप्रिया सुळे

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** '''राष्ट्रवादी काँग्रेसचे दोनच नेते पुण्यात लक्ष घालत होते, त्यामुळे मी खडकवासला सोडून कधी पुण्यात लक्ष घातले नाही. आता इथे बरेच कारभारी बदलले आहेत, त्यामुळे मलाही आता पुण्यात काम करावे लागेल. आज संघर्ष माझ्या वाट्याला आला आहे, त्यावर मात केल्याशिवाय राहणार नाही'', अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी रविवारी पुण्याच्या राजकारणात सक्रिय होणार असल्याचा थेट संकेत दिला. पुणे नवरात्र महोत्सवाचे उद्घाटन सुळे यांच्या हस्ते रविवारी गणेश कला क्रीडा मंच येथे झाले. यावेळी आमदार रवींद्र धंगेकर, पोलिस सहआयुक्त संदीप कर्णिक, माजी आमदार उल्हास पवार, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष प्रशांत जगताप, काँग्रेसचे नेते मोहन जोशी, रमेश बागवे, बाळासाहेब शिवरकर, महोत्सवाचे अध्यक्ष आबा बागूल, जयश्री बागूल आदी उपस्थित होते. उद्योजक डॉ.संजय मालपाणी, भारती हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, वन्यजीव छायाचित्रकार स्वागत थोरात, लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे, लावणी कलाकार रूपाली व दीपाली जाधव परभणीकर यांना ''श्री लक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच सामाजिक कार्यकर्ते शिरीष बोधनी यांचाही सत्कार करण्यात आला. ''नगरसेवक नसल्याने माझीही अडचण होत आहे. सरकारने सर्वेक्षण बघायचे सोडून, महापालिका निवडणूका अगोदर घ्याव्यात' अशी मागणी सुळे यांनी केली. त्या म्हणाल्या, '''शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, असे म्हणतात, पण मी पहिल्यांदाच थेट सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढले. तेव्हा शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष माझ्या खांद्याला खांदा लावून साथ देत होते. तर काँग्रेसचे मातब्बर वकील माझ्या पाठीशी होते.त्यानंतर सलग तीन दिवस देशात काँग्रेसच्या नेत्यांसमवेत बैठकांना जात आहे. त्यामुळे नियतीच्या मनात महाविकास आघाडीबाबत काहीतरी चांगले होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.' भाजपला राजकीय व धोरणात्मक विरोध असतानाही आम्ही महिला आरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहिलो. मात्र त्यांनी महिला आरक्षण विधेयक मांडताना त्यावर नावे, सह्या घेतल्या पण तारीख न टाकून मोठी जुमलेबाजी केली. त्यामुळे महिला आरक्षण पास होण्याची शक्यता नाही. ''इंडिया'चे सरकार येईल, तेव्हाच आम्ही महिला आरक्षण विधेयक आणू, असेही त्यांनी सांगितले. मी मीरा बोरवणकर यांचे पुस्तक काही वाचलेले नाही, आरोप करणारे लेखक आहेत. त्यामुळे त्याच त्याविषयी अधिक स्पष्टीकरण देऊ शकतील. मी जे पाहिले नाही, त्यावर काय बोलणार, अशा शब्दात सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्यावर बोरवणकर यांनी केलेल्या आरोपांबाबत उत्तर देण्याचे टाळले. तर अमली पदार्थ तस्कर ललित पाटील, याच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावरून देवेंद्र फडणवीस गृहमंत्री झाल्यावर राज्यातील गुन्हेगारी कशी वाढते, अशा शब्दात त्यांच्यावर टीका केली.



### आम्ही आरक्षण विधेयक आणू

» भाजपला राजकीय व धोरणात्मक विरोध असतानाही आम्ही महिला आरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहिलो. मात्र त्यांनी महिला आरक्षण विधेयक मांडताना त्यावर नावे, सह्या घेतल्या पण तारीख न टाकून मोठी जुमलेबाजी केली. त्यामुळे महिला आरक्षण पास होण्याची शक्यता नाही. ''इंडिया'चे सरकार येईल, तेव्हाच आम्ही महिला आरक्षण विधेयक आणू, असेही त्यांनी सांगितले.

# ऐन सणासुदीत नागरिकांची पाण्यासाठी तारांबळ!

## राजीव गांधी प्राणी संग्रहालय पंपिग स्टेशनवरुन पाणीपुरवठा खंडित

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राजीव गांधी प्राणी संग्रहालयाजवळील पंपिग स्टेशनवरुन पाणीपुरवठा खंडित झाल्याने ऐन सणासुदीत पाण्यासाठी नागरिकांची तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. केदारेश्वर टाकीला जाणाऱ्या पंप क्रमांक तीनची बेअरिंग खराब झाल्याने पंप बंद झाला होता. त्यामुळे पाणीपुरवठा झाला नाही. शनिवारी दुपारी हा बिघाड झाल्यानंतर रविवारी दिवसभर पाणीपुरवठा झाला नाही. केदारेश्वर टाकीवरुन पाणीपुरवठा होणाऱ्या सुखसागरनगर भाग १, भाग २ राजस सोयायटी परिसर, साईनगर आदीसह सुखदा वरदा संकुल, चैत्रांगण, सुखनिवास आदी सोसायट्यांमध्ये पाणीपुरवठा न झाल्याने नागरिक त्रस्त झाले. घटस्थापनेचा पहिलाच दिवस आणि पाणी नसल्याने महिलांची चिडचिड झाली. या घटनेने नागरिकांच्या मनात पाणीप्रश्नांवरून प्रशासनाच्या विरोधात प्रचंड चीड निर्माण झाली असून मागील काही दिवसांपासून पाणीचोरी, पाणीगळती होत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत असताना ऐन सणाच्या दिवशी पाणीपुरवठाच झाला नसल्याच्या तक्रारीने नागरिक हतबल झाल्याचे पाहायला मिळाले. अनेकांनी पाणी विकत घेत तात्पुरती व्यवस्था केली.



> पंपिंग स्टेशनमध्ये बिघाड झाल्याने शनिवारी दुपारपासून ही परिस्थिती ओढवली आहे. आता विद्युत विभागाकडून पंपाचे काम करण्यात आले असून टाक्या भरल्या की पाणीपुरवठा सुरळित होईल. त्यासाठी सोमवारी दुपारपर्यंत वेळ जाईल असा अंदाज आहे.
>
> **- संदीप मिसाळ,** शाखा अभियंता पाणीपुरवठा

> राजीव गांधी प्राणीसंग्रहालयाजवळील पंपिग स्टेशनवरील केदारेश्वर झोनसाठी असणाऱ्या पंप क्रमांक तीनमध्ये बिघाड झाला होता. त्यामुळे तो पंप बंद झाला. दुसरा पंप पहाटे चार वाजता चालू करण्यात आला. त्यानंतर आता पाणीपुरवठा सुरळीत होईल.
>
> **- जालिंदरसिंह राजपूत,** शाखा अभियंता, विद्युत विभाग

> अपुरा पाणीपुरवठा होत असताना आज ऐन सणासुदीच्या दिवशी पाणीपुरवठा झाला नाही. पाणीपुरवठा अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा केली असता पंपिंग बंद असल्याचे सांगण्यात येते. आम्हाला सामान्य माणसांना यातील काही कळत नाही. पण, ऐन सणासुदीच्या दिवशी पाणी न आल्याने प्रचंड चिडचिड झाली. अखेर टँकरने पाणी आल्यावर प्रश्न मिटला.
>
> **– श्रद्धा कुलकर्णी,** स्थानिक महिला

# जेजुरीच्या खंडोबा गडावर घटस्थापना!

## भाविकांना नवरात्र उत्सव काळात उंबऱ्यातून दर्शनाचा मिळणार लाभ

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर रविवारी ( १५ ऑक्टोबर ) सकाळी ११ वाजता धार्मिक वातावरणात राज्याचे धर्मादाय आयुक्त महेंद्र महाजन व पुणे विभागाचे सह धर्मादाय आयुक्त सुधीर कुमार बुक्के यांच्या हस्ते घटस्थापना स्थापना करण्यात आली.
यावेळी देवस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, अनिल सौंदडे, वकील पांडुरंग थोरवे, वकील विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर, खांदेकरी





मानकरी ट्रस्टचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, कृष्णा कुदळे, पुजारी गणेश आगलावे, मिलिंद सातभाई, माधव बारभाई, चेतन सात भाई, ऋषिकेश सातभाई, धनंजय आगलावे, वैभव दिडभाई, अनिल बारभाई, दीपक बारभाई आदी उपस्थित होते. वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी यांनी कार्यक्रमाचे पौरोहित्य केले. पहाटे नेहमीप्रमाणे खंडोबाची भूपाळी झाल्यावर सर्व मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला. भंडार घरामध्ये ठेवलेल्या उत्सव मूर्ती मुख्य गाभाऱ्यात नेण्यात आल्या. तेथे पाखळली झाल्यावर सनई चौघड्याच्या निनादात उत्सव मूर्ती नवरात्र महालामध्ये (बालदारी) आणण्यात आल्या. या ठिकाणी अकरा वाजता घटस्थापना करण्यात आली. यावेळी घडशी समाज बांधवांनी पारंपारिक सनई चौघडा वादन केले. जेजुरीचा दसरा उत्सव, खंडा उचलणे स्पर्धा राज्यामध्ये प्रसिद्ध आहे. घटस्थापनेनिमित्त खंडोबा गडाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ग्रामस्थांना व येणाऱ्या भाविकांना नवरात्र उत्सव काळात उंबऱ्यातून दर्शनाचा लाभ मिळणार आहे.

### सनई चौघड्याच्या निनादात उत्सव

**» वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी यांनी कार्यक्रमाचे पौरोहित्य केले. पहाटे नेहमीप्रमाणे खंडोबाची भूपाळी झाल्यावर सर्व मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला. भंडार घरामध्ये ठेवलेल्या उत्सव मूर्ती मुख्य गाभाऱ्यात नेण्यात आल्या. तेथे पाखळली झाल्यावर सनई चौघड्याच्या निनादात उत्सव मूर्ती नवरात्र महालामध्ये ( बालदारी ) आणण्यात आल्या. या ठिकाणी अकरा वाजता घटस्थापना करण्यात आली. यावेळी घडशी समाज बांधवांनी पारंपारिक सनई चौघडा वादन केले.**

# वडगाव निंबाळकर परिसरात बैलपोळा उत्साहात साजरा!

## डीजेच्या तालावर मिरवणूक काढून बैलपोळा साजरा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
गेल्या तीन वर्षांत शेतकऱ्यांना बैलपोळा साजरा करता आला नाही. या वेळी पडलेला पाऊस, बैलगाडा शर्यत बंदी शिथिल झाल्याने बैलांना आलेला भाव आणि 'पशुधनाच्या प्रेमापोटी होऊ द्या खर्चा'ची भूमिका ठेऊन शेतकऱ्यांनी एकत्र येत डीजेच्या तालावर मिरवणूक काढून वडगाव निंबाळकर परिसरात बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा केला. गेल्या तीन वर्षांपूर्वी कोरोना रोगाचे सावट असल्याने बैलपोळा साजरा झाला नाही. यानंतर लंम्पी रोगामुळे जनावरांना एकत्र आणता आले नाही. परिणामी बैलपोळा साजरा झाला नाही. या वेळी परिस्थिती बरी आहे. दसरा- दिवाळीच्या सणापूर्वी शेतकऱ्यांमधून उत्साहाचे वातावरण आहे. बागायती पट्टा असलेल्या



वडगाव निंबाळकर परिसरातील बहुतांशी शेतकऱ्यांच्याकडे पशुधन आहे. दूध उत्पादनावर अर्थकारण चालत असल्यामुळे पशुधना विषयी शेतकऱ्यांमधून आदराची भावना आहे. 'पशुधनावर कमावतो, मग खर्चायला काय हरकत आहे' या भावनेतून विविध भागांतील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामुदायिक मिरवणुका काढल्या. यामध्ये 'डीजे'च्या तालावर गावातून मिरवणुकीने नगर प्रदक्षिणा केली. ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरासमोर किंगरेमळा, दरेकरमळा, परांडेमळा येथील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन फटाक्यांची आतषबाजी करीत उत्सव साजरा केला. 'जनावरांची रोगराई हटून पाऊस पाणी पडू दे' अशी प्रार्थना ग्रामदैवतासमोर करण्यात आली. बैलगाडा शर्यत बंदी शिथिल झाल्यामुळे बैलांना चांगली किंमत आहे. पुणे-मुंबई शहरी भागातील बैलगाडा मालकांचे बैल येथील शेतकऱ्यांकडे सांभाळायला असतात, या मुळे परिसरातील अनेक तरुण बैलगाडा शर्यतीच्या तयारीत गुंतलेले असतात. शर्यतीची बैलजोडी असलेल्या शेतकऱ्यांना मोठी प्रतिष्ठा आहे. तालुक्यात बैलगाडा शर्यती मोठ्या प्रमाणात पार पडल्या. यामुळे बैलजोडीसह गाडा मालकांचे फ्लेक्स बोर्ड सोशल मीडियावर झळकत होते. बक्षीस पात्र बैलांची नावे तोंडपाठ झाल्यामुळे बैलांची तरुणांच्या मनात क्रेझ आहे.

> **“ शेती आणि दूध उत्पादन हा आमचा पिढीजात व्यवसाय आहे. बैलजोडी देशी वंशाची सांभाळली जाते, यामुळे देशी गाई सांभाळण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.**
> **- प्रदीप दरेकर, वडगाव निंबाळकर, दूध उत्पादक शेतकरी**

### तरुणांची उडाली तारांबळ

**» 'डीजे'समोर बैलांना ठेऊन काढलेल्या मिरवणुकीत बैलांना आवरताना तरुणांची मोठी तारांबळ उडाली. एका बाजूने बैलांना आवरायचे, तर दुसऱ्या बाजूला 'डीजे'समोर नाचणाऱ्या तरुणांना प्रतिसाद द्यायचा, दोन्ही भूमिका पार पाडणारे तरुण मिरवणुकीचे आकर्षण ठरले.**